खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२५ – २६

## वाणिज्य महोत्सव

पुढारी

### राजगुरू महाविद्यालयात वाणिज्य महोत्सव

**राजगुरुनगर :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात वाणिज्य विभागाच्या वतीने दि. १६ ते १८ दरम्यान 'कॉर्पोरेट' या संकल्पनेवर आधारित वाणिज्य महोत्सव उत्साहात पार पडला. महोत्सवाचे उद्घाटन युवा उद्योजक तथा मोनार्च ग्रुप ऑफ हॉटेल्सचे प्रमुख सीए राहुल टाकळकर यांच्या हस्ते झाले. या वेळी संस्थाध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब लिंभोरे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, डॉ. पायल ओसवाल, प्रा. प्रियंका बालघरे व डॉ. गणेश धुमाळ उपस्थित होते. महोत्सवातील विविध स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक मिळवलेल्या छकुली केदारी, हर्षदा पवार, श्रावणी जैद, हर्षल गेडाम, प्राजक्त आवारी, प्रतीक्षा आवारी, विलास सरडे, सिद्धी भदाणे, ओंकार सांडभोर आणि श्रीमंत हातागळे या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या तीन दिवसीय महोत्सवाचे आयोजन वाणिज्य विभागप्रमुख डॉ. गणेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. रुपाली कातोरे, प्रा. हेमलता चौधरी, प्रा. राजश्री सावंत, डॉ. तृप्ती दळवी, प्रा. जयश्री गोगावले व प्रा. ओंकार टाकळकर यांनी केले.

My Pune Gramin Edition
Mar 20, 2026 Page No. 7
Powered by: erelego.com

# राजगुरुनगर येथे वाणिज्य महोत्सव उत्साहात

राजगुरुनगर :येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात वाणिज्य विभागांतर्गत दि. १६ ते १८ दरम्यान 'कॉर्पोरेट' या संकल्पनेवर आधारित वाणिज्य महोत्सव उत्साहात पार पडला. यामध्ये बिजनेस गेम्स, सांस्कृतिक कार्यक्रम, रांगोळी स्पर्धा, रेखाचित्र स्पर्धा, ऍड-मॅड-शो, पोस्टर स्पर्धा, फॅशन शो अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या महोत्सवाचे उद्घाटन मोनार्च ग्रुप ऑफ हॉटेल्सचे प्रमुख राहुल टाकळकर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब लिंभोरे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, डॉ. पायल ओसवाल, प्रा. प्रियंका बालघरे, डॉ. गणेश धुमाळ उपस्थित होते. टाकळकर यांनी उद्योजक होण्यासाठी कठोर परिश्रम, जिद्द व नियमित अभ्यासाचे महत्त्व अधोरेखित केले. आपला जीवनप्रवास सांगताना त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ नोकरीच्या मागे न लागता नाविन्यता, कल्पकता, धाडस दाखवून उद्योजकतेत उतरण्याचे आवाहन केले.

संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी वाणिज्य शाखेचे मार्केटमधील महत्त्व, रोजगाराच्या संधीबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. चाकण एमआयडीसी आणि कृषी क्षेत्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी उद्योगाच्या आणि रोजगाराच्या संधी शोधाव्यात असे आवाहन केले.वाणिज्य महोत्सवातील विविध उपक्रमांत प्रथम क्रमांक प्राप्त छकुली केदारी, हर्षदा पवार, श्रावणी जैद, हर्षल गेडाम, प्राजक्त आवारी, प्रतीक्षा आवारी, विलास सरडे, सिद्धी भदाणे, ओंकार सांडभोर, श्रीमंत हातागळे या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन विशेष गौरव करण्यात आला.या तीन दिवसीय वाणिज्य महोत्सवाचे आयोजन वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. गणेश धुमाळ यांच्यासह डॉ. रूपाली कातोरे, प्रा. हेमलता चौधरी, प्रा. राजश्री सावंत, डॉ. तृप्ती दळवी, प्रा. जयश्री गोगावले, प्रा. ओंकार टाकळकर यांनी केले.



**राजगुरुनगर : येथे वाणिज्य महोत्सवाचे उद्घाटन उद्योजक राहुल टाकळकर यांच्या हस्ते करण्यात आले.**

राज्य लोकतंत्र
21 Mar 2026 - Page 3

# राजगुरू महाविद्यालयात वाणिज्य महोत्सव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर** : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात वाणिज्य विभागातर्फे १६ ते १८ मार्चदरम्यान 'कॉर्पोरेट' या संकल्पनेवर आधारित वाणिज्य महोत्सव उत्साहात पार पडला. महोत्सवात व्यवसायाभिमुख आणि सांस्कृतिक अशा विविध उपक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या महोत्सवात बिझनेस गेम्स, सांस्कृतिक कार्यक्रम, रांगोळी स्पर्धा, रेखाचित्र स्पर्धा, अॅड-मॅड शो, पोस्टर स्पर्धा आणि फॅशन शो अशा विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



महोत्सवाचे उद्घाटन युवा उद्योजक तथा मोनार्च ग्रुप ऑफ हॉटेल्सचे प्रमुख सीएस राहुल टाकळकर यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थाध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब लिंभोरे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, डॉ. पायल ओसवाल, प्रा. प्रियंका बालघरे आणि डॉ. गणेश धुमाळ उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी बोलताना राहुल टाकळकर यांनी उद्योजक होण्यासाठी कठोर परिश्रम, जिद्द आणि नियमित अभ्यास यांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता नाविन्य, कल्पकता आणि धाडस यांच्या बळावर उद्योजकतेकडे वळावे, असे आवाहन त्यांनी केले.

संस्थाध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी वाणिज्य शाखेचे बदलत्या बाजारपेठेतील महत्त्व आणि रोजगाराच्या विविध संधींबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. चाकण एमआयडीसी आणि कृषी क्षेत्राच्या माध्यमातून उद्योग व रोजगाराच्या नव्या संधी शोधण्याचे आवाहनही त्यांनी केले. महोत्सवातील विविध स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या छकुली केदारी, हर्षदा पवार, श्रावणी जैद, हर्षल गेडाम, प्राजक्त आवारी, प्रतीक्षा आवारी, विलास सरडे, सिद्धी भदाणे, ओंकार सांडभोर आणि श्रीमंत हातागळे या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

या तीन दिवसीय महोत्सवाचे आयोजन वाणिज्य विभागप्रमुख डॉ. गणेश धुमाळ यांच्यासह डॉ. रूपाली कातोरे, प्रा. हेमलता चौधरी, प्रा. राजश्री सावंत, डॉ. तृप्ती दळवी, प्रा. जयश्री गोगावले आणि प्रा. ओंकार टाकळकर यांनी केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख